नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd
अंक - २१४ | Issue - 214
वार शनिवार दि. २१ डिसेंबर २०२४ | Blow- Saturday Date 21 December 2024
ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com
वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com
पाने - ४ | Pages - 4
किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs
पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### 'एमपीएससी'च्या भरती वयोमर्यादेत एक वर्षाची वाढ; लाखो उमेदवारांना सरकारचा दिलासा

मुंबई : राज्य लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) राज्य शासकीय सेवेतील विविध पदांच्या भरतीसाठीच्या कमाल वयोमर्यादेत एक वर्षाने वाढ करण्याचा निर्णय शुक्रवारी राज्य सरकारने घेतला आहे. वयोमर्यादा ओलांडल्याने नोकरीपासून वंचित राहण्याची चिंता लागलेल्या लाखो उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरिता (मराठा समाज) २६ फेब्रुवारी २०२४ पासून १० टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाची प्रक्रिया सुरू असतानाच एमपीएससीने पदभरतीच्या जाहिराती प्रसिद्ध केल्या होत्या. मात्र राज्य सरकारने या जाहिरातीमध्ये बदल करून मराठा समाजाच्या आरक्षणाचा समावेश करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार भरतीची पदसंख्या व आरक्षण नमूद करून सुधारित जाहिराती प्रसिद्धीस आयोगाला २०२४ च्या नियोजित वेळापत्रकापेक्षा विलंब झाला आहे. वयोमर्यादा ओलांडल्याने उमेदवार अर्ज करू शकत नव्हते. त्यांना या निर्णयाने दिलासा मिळणार आहे.

# बीडमधील गुन्हेगारीची पाळेमुळे खणून काढणार, दोषींवर मकोका अंतर्गत कारवाई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## परभणीतील घटनेची न्यायालयीन चौकशी होणार; पोलीस अधिकारी निलंबित

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नागपूर : बीड, परभणी मधील घटना दुर्दैवी आहेत. या दोन्ही घटनांची सरकारने गंभीर दखल घेतली असून बीड जिल्ह्यातील हत्येच्या प्रकरणाची न्यायालयीन आणि एसआयटी अशी दुहेरी चौकशी केली जाईल. तर परभणी मधील संपूर्ण घटनेची न्यायालयीन चौकशी केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली.

बीड, परभणी घटनांमधील दोन्ही मृतांच्या कुटुंबियांना दहा लाख रुपयांची आर्थिक मदत केली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. त्यानुसार बीडमध्ये हत्या झालेल्या सरपंच संतोष देशमुख आणि परभणी मधील घटनाक्रमात मृत सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांना ही दहा लाखांची मदत देण्यात येणार आहे.

बीड मधील प्रकरणाची न्यायालयीन व एसआयटी मार्फत चौकशी करण्याबरोबर जिल्हा पोलीस अधीक्षकांची बदली करण्यात येईल. या प्रकरणातील दोषींवर मकोका अंतर्गत कारवाई करून बीड जिल्ह्यातील भूमाफिया, वाळूमाफियांसह इतर प्रकारच्या गुन्हेगारीची पाळेमुळे खणून काढू, अशी स्पष्ट भूमिकाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी विधानसभेत मांडली. परभणीत पोलीस अधिकारी अशोक घोरबांड यांना निलंबित करून त्यांनी वाजवीपेक्षा अधिक पोलीस बळाचा वापर केला आहे काय, याची चौकशी केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.




बीड, परभणी येथील घटनेसंदर्भात विधानसभेत झालेल्या अल्पकालीन चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, परभणी जिल्ह्यातील घटना अत्यंत दुर्दैवी आहे. भारताच्या संविधानाचा अपमान हा सर्व भारतीयांचा अपमान आहे. त्यामुळे हा अपमान सहन केला जाणार नाही. परभणी येथील कृत्य एका मनोरूग्णाने केले आहे. तो मनोरुग्ण असल्याचा स्पष्ट वैद्यकीय अहवालही उपलब्ध आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत सर्व राजकीय पक्षांनी तणाव कमी करण्यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे. या प्रकरणात कोंबिंग ऑपरेशन झाले नाही. परभणीत सकल हिंदू समाजाचा मोर्चा हा सर्वपक्षीय होता. या मोर्चात बांग्लादेशमधील हिंदूंसंदर्भात मागणी करण्यात आली होती.

**बीड, परभणीतील मृतांच्या कुटुंबियांना दहा लाखांची मदत**

त्यामुळे ही हिंदू विरूद्ध दलित अशी दंगल नाही. परभणीत झालेल्या तोडफोडीत दुकाने, वाहने, सरकारी कार्यालयांचे नुकसान झाले आहे, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बीड येथील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी मोहीम हाती घेणार असून चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे. बीडमध्ये आवाडा ग्रीन एनर्जी कंपनीने गुंतवणूक केली आहे. या कंपनीची कामे आम्हालाच द्या किंवा खंडणी द्या अशी मानसिकता काहींची तयार झाली आहे. त्यामुळे बीड प्रकरणातील मास्टरमाईंड कोणीही असला तरी त्याच्यावर कारवाई केली जाईल. या प्रकरणात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग असणाऱ्यांवर देखील मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येईल. बीड जिल्ह्यातील पोलीसांनी देखील योग्य कारवाई करावी. गुन्हे दाखल करताना वस्तुस्थिती तपासावी, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

# कल्याणमधील मारहाणप्रकरणी शुक्ला यांच्यासह दोन जण ताब्यात

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**




कल्याण : येथील पश्चिमेतील आजमेरा सोसायटीत मराठी कुटुंबियांना केलेल्या मारहाण आणि हल्ला प्रकरणी पोलिसांच्या विशेष पथकांनी शक्रवारी दिवसभरात दोन जण ताब्यात घेतले. या गुन्ह्यातील मंत्रालयीन अधिकारी अखिलेश शुक्ला यांनी शुक्रवारी त्यांची भूमिका मांडणारी दृश्यध्वनी चित्रफित समाज माध्यमांत सामायिक केली होती. या चित्रफितीच्या आधारे पोलिसांनी शुक्ला यांना टिटवाळा-शहाड भागातून ताब्यात घेतले. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांना अटक केले जाईल, अशी माहिती कल्याण परिमंडळाचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी येथे माध्यमांना दिली.

या प्रकरणात गुन्हा दाखल करताना हलगर्जीपणा करणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांची साहाय्यक पोलीस आयुक्त चौकशी करत आहेत. या प्रकरणात ते दोषी आढळून आले तर त्यांच्यावरही कारवाई केली जाईल, असे उपायुक्त झेंडे यांनी माध्यमांना सांगितले. सुमित जाधव (२३), रंगा उर्फ दर्शन बोराडे (२२) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

अभिजित देशमुख यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करणाऱ्या गुन्हा दाखल दहा जणांपैकी दोन जणांना विशेष पथकांनी ताब्यात घेतले आहे. या दोन जणांवर महात्मा फुले पोलीस ठाण्यात यापूर्वी गुन्हे दाखल आहेत. यापुर्वीचे आणि आताचा गुन्हा यांची चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाणार आहे. पोलिसांची चार विशेष पथके उर्वरित हल्लेखोरांचा शोध घेत आहेत, असे उपायुक्त झेंडे यांनी सांगितले. या गुन्ह्याचे स्वरूप आणि तपासात पुढे येणारी माहिती या अनुषंगाने गुन्ह्याची नवीन कलमे या प्रकरणात नोंदवली जाणार आहेत, असे उपायुक्त झेंडे यांनी सांगितले. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आजमेरा संकुल, योगीधाम व्यापारी संघटना, परिसरातील नागरिक, मनसे, उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष, माय मराठी प्रतिष्ठानचे पदाधिकारी यांनी उपायुक्त झेंडे यांच्याकडे केली आहे. या गुन्ह्यातील सहभागींवर १०९ अंतर्गत कारवाई करावी, अन्यथा शिवसेनेतर्फे आंदोलन केले जाईल, असा इशारा उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते विजय साळवी यांनी पोलिसांना दिला आहे.

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठ्यासोबत मोफत वीज योजनेची भरपाई

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोफत वीज देण्याची योजना पुढील पाच वर्षे चालू ठेवण्याचा सरकारचा निर्धार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करण्यासोबतच त्यांना मोफत वीज देण्यासाठी होणाऱ्या खर्चाची भरपाई होणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत दिली. अत्यंत कमी काळात योजनेची अंमलबजावणी केल्याबद्दल त्यांनी ऊर्जा विभागाचे अभिनंदन केले.

मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना दिवसा अखंडित थ्री फेज वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेचे काम सुरू केले आहे. त्या अंतर्गत एमएसईबी सोलर ग्रो पॉवर लिमिटेड ही देशातील पहिली शेतकऱ्यांना वीज देणारी कंपनी स्थापन केली. कंपनीच्या अंतर्गत १६ हजार मेगावॅट क्षमतेचे वीजनिर्मीतीचे सौर ऊर्जा प्रकल्पांचे काम सुरू केले आहे. यामध्ये ८४२८ कृषी वाहिन्या (फीडर्स) सौर ऊर्जेवर चालवणार आहोत. आतापर्यंत ६६९ मेगावॅट एवढी क्षमता कार्यान्वित झाली आहे. त्यातून १, ३०,४८६ कृषी ग्राहकांना दिवसा वीज पुरवठा सुरू केला आहे. २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅटची कामे पूर्ण करून सर्व शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करण्याचा प्रयत्न आहे. त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांकडून आगामी पाच वर्षात विजेचे बिल घ्यायचे नाही, हा निर्धार कायम आहे. शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यासाठी अर्थसंकल्पावर सध्या १५ हजार कोटी रुपयांचा भार पडतो तेवढेच पैसे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे वाचणार आहेत. सध्या आठ रुपये प्रतियुनिट दराने मिळणारी वीज शेतकऱ्यांना दीड रुपये प्रती युनीट दराने उपलब्ध केली जाते. आता हे बिलही सरकार भरते. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत तीन रुपये प्रति युनिट दराने वीज मिळणार असल्याने वीज खरेदीत दहा हजार कोटी रुपये वाचतील. तसेच अनुदान आणि क्रॉस सबसिडीच्या पाच हजार कोटी रुपयांची बचत होईल. परिणामी २०२६ पर्यंत शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासोबतच त्यांच्या मोफत वीज योजनेचे पैसेही मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे वाचणार आहेत.

मा. मुख्यमंत्री म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या अंमलबजावणीबद्दल आपण ऊर्जा विभागाचे अभिनंदन करतो. खूप कमी काळामध्ये योजनेसाठी जमीन शोधणे, त्यावर सौर ऊर्जा प्रकल्प विकसित करण्यासाठी निविदा काढणे, विकसक निवडणे हे काम पारदर्शीपणे करण्यात आले. कमीत कमी दरात वीज उपलब्ध करण्यासाठी रिव्हर्स बिडिंग पद्धतीने काम करण्यात आले. त्यांनी सांगितले की, मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचे गतीने काम चालू आहे. त्यासाठी ९ लाख कृषी पंप उपलब्ध आहेत.

त्यामुळे पेड पेंडिंग आता संपुष्टात येईल. आतापर्यंत २,३६,१८६ सौर कृषी पंप आस्थापित केले आहेत. जेव्हापासून सौर पंप योजना सुरू झाल्या त्या काळात जेवढे सौर पंप लावले त्यापेक्षा अधिक सौर पंप गेल्या एका वर्षात आस्थापित केल्या आहेत. या कामगिरीबद्दल विभागाचे अभिनंदन. आपल्या सरकारने ऊर्जा क्षेत्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात योजना सुरू केल्या आहेत. राज्याची आतापर्यंतची स्थापित वीजनिर्मिती क्षमता ४४ हजार मेगावॅटची आहे. आता ५४ हजार मेगावॅटचे वीज खरेदीचे करार झाले आहेत. सध्या वीज पुरवठ्यामध्ये १६ टक्के वीज अपांपरिक तर ८४ टक्के पारंपरिक आहे. आपण हाती घेतलेल्या प्रकल्पांमुळे २०३० पर्यंत राज्यात ५२ टक्के वीज पुरवठा अपारंपरिक विजेचा म्हणजेच हरित ऊर्जेचा असेल तर ४८ टक्के वीज पुरवठा पारंपरिक असेल, अशी माहिती त्यांनी दिली.

**अकरा जणांचा मृत्यू, ४० हून अधिक जण जखमी**

**२०० फूट उंचीपर्यंत आगीच्या ज्वाळा**

# जयपूर-अजमेर रस्त्यावर एलपीजी टँकरचा स्फोट

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

जयपूर : राजस्थानमधील जयपूर-अजमेर रस्त्यावर एका एलपीजी टँकरचा स्फोट झाला. या अपघातामधील मृतांचा आकडा ११ वर पोहोचला आहे. अपघातानंतर आगीच्या ज्वाळांनी आसमंत भरुन गेला. तब्बल २०० फूट उंचीपर्यंत आगीच्या ज्वाळा दिसत होत्या. या अपघातात अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत.

जयपूर-अजमेर रस्त्यावर एलपीजी-सीएनजी टँकरची धडक झाली. त्यानंतर झालेल्या अग्निकांडात ११ जणांचा जीव गेला. यातील एक जण तर अतिशय अभागी ठरला. अपघातानंतर झालेल्या स्फोटात तो जिवंत जळाला. त्याचा मृतदेह इतक्या भीषण पद्धतीनं जळून गेला की तो एका प्लास्टिकच्या



लहानशा पिशवीत ठेवण्यात आला. मृतदेहाचे केवळ अवशेष हाती लागले. हे अवशेष ट्रक चालकाच्या मृतदेहाचे सांगण्यात येत आहे. मात्र अद्याप तरी त्याची ओळख पटलेली नाही.

राजस्थानातील जयपूर-अजमेर महामार्गावर शुक्रवारी सकाळी एलपीजीनं भरलेल्या एका टँकरनं अन्य टकर आणि ट्रकला धडक दिली. त्यानंतर टँकरचा स्फोट झाला आणि त्यानं पेट घेतला. आसपासच्या अन्य वाहनंदेखील आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. त्यानंतर अग्नीतांडव सुरु झालं. अनेक ट्रक जळाले. त्यांची नेमकी संख्या अद्याप समजू शकली नाही. आगीत होरपळलेल्यांना रुग्णवाहिकांतून रुग्णालयांमध्ये उपचारांसाठी दाखल करण्यात आलं आहे.

अपघातात ४० हून अधिक जण जखमी झाले आहेत. यातील अनेकांची प्रकृती गंभीर आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढू शकतात. पेट्रोल पंपच्या समोर घडलेला अपघात सीसीटीव्हीत कैद झाला. घटनास्थळी पोहोचलेल्या अग्निशमन दलाच्या वाहनांनी आगीवर नियंत्रण मिळवलं. या कालावधीत महामार्गावरील वाहतूक रोखण्यात आली. मदत आणि बचाव कार्य पूर्ण झाल्यानंतर वाहतुकीसाठी महामार्ग सुरु करण्यात आला.

राजस्थानच्या मुख्यमंत्र्यापासून देशाच्या गृहमंत्र्यांपर्यंत अनेकांनी या भीषण अपघाताबद्दल दु:ख व्यक्त केलं. 'जयपूर-अजमेर राष्ट्रीय महामार्गावर गॅस टँकरच्या अपघातात नागरिकांचा मृत्यू झाल्याचं वृत्त समजताच मन अतिशय व्यथित झालं. घटनेची माहिती मिळताच एसएमएस रुग्णालय गाठून डॉक्टरांनी तात्काळ आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या सूचना केल्या. प्रशासनाकडून बचाव कार्य सुरु आहे. स्थानिक प्रशासन आणि आपत्कालीन सेवा पूर्ण तत्परतेनं कार्यरत आहेत,' असं मुख्यमंत्री भजनलाल यांनी म्हटलं.

# संसदेचे वादळी अधिवेशन संस्थगित

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : संविधान, अदानी, डॉ. आंबेडकर अशा अनेक वादग्रस्त मुद्द्यांमुळे वादळी ठरलेले संसदेचे हिवाळी अधिवेशन शुक्रवारी संस्थगित झाले. अधिवेशन संपल्यानंतर लोकसभाध्यक्षांच्या दालनात होणाऱ्या परंपरागत चहापानावर विरोधी पक्षांच्या गटनेत्यांनी बहिष्कार टाकला.

अधिवेशनादरम्यान विरोधक व सत्ताधारी यांच्यामध्ये कितीही वाद वा मतभेद झाले तरी, लोकसभाध्यक्षांच्या दालनातील चहापानासाठी विरोधी पक्षांचे नेते उपस्थित राहतात. पंतप्रधान, विरोधी पक्षनेते, इतर पक्षांचे गटनेते यांच्यामध्ये चहापानाच्या निमित्ताने संवाद होत असतो. मात्र, या वेळी ही परंपरा खंडित झाली. डॉ. आंबेडकरांच्या अपमानाच्या मुद्द्यावरून सत्ताधारी व विरोधकांमध्ये गुरुवारी झालेल्या संघर्षानंतर भाजपने राहुल गांधींविरोधात गुन्हे दाखल केले. काँग्रेसच्या खासदारांविरोधात गुन्हे दाखल होत असतील तर लोकसभाध्यक्षांच्या चहापानाला कशासाठी उपस्थित राहायचे, असे काँग्रेसचे म्हणणे होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी डॉ. आंबेडकरांचा अपमान केला असून पंतप्रधानांनी त्यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी शुक्रवारी काँग्रेस व 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांनी लावून धरली. विरोधी नेत्यांनी आंबेडकरांची छायाचित्रे हातात घेऊन विजय चौकातून संसदेच्या आवारातील डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यापर्यंत मोर्चा काढला. त्यानंतर शहांविरोधात जोरदार घोषणाबाजीही करण्यात आली. विरोधकांच्या मोर्चाला भाजप व 'एनडीए' आघाडीतील सदस्यांनीही संसदेच्या आवारात घोषणाबाजी करून प्रत्युत्तर दिले. लोकसभेचे कामकाज सुरू होताच विरोधकांचा गदारोळ सुरू झाला. या गोंधळातच लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी सदस्यांना कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले.

## संपादकीय....

### शेतकऱ्यांना दिलासा

शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोफत वीज देण्याची योजना पुढील पाच वर्षे चालू ठेवण्याचा सरकारचा निर्धार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करण्यासोबतच त्यांना मोफत वीज देण्यासाठी होणाऱ्या खर्चाची भरपाई होणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत दिली. अत्यंत कमी काळात योजनेची अंमलबजावणी केल्याबद्दल त्यांनी ऊर्जा विभागाचे अभिनंदन केले. मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना दिवसा अखंडित थ्री फेज वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेचे काम सुरू केले आहे. त्या अंतर्गत एमएसईबी सो-लर ग्रो पॉवर लिमिटेड ही देशातील पहिली शेतकऱ्यांना वीज देणारी कंपनी स्थापन केली. कंपनीच्या अंतर्गत १६ हजार मेगावॅट क्षमतेचे वीजनिर्मीतीचे सौर ऊर्जा प्रकल्पांचे काम सुरू केले आहे. यामध्ये ८४२८ कृषी वाहिन्या (फीडर्स) सौर ऊर्जेवर चालवणार आहोत. आतापर्यंत ६६९ मेगावॅट एवढी क्षमता कार्यान्वित झाली आहे. त्यातून १, ३०,४८६ कृषी ग्राहकांना दिवसा वीज पुरवठा सुरू केला आहे. २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅटची कामे पूर्ण करून सर्व शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करण्याचा प्रयत्न आहे. त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांकडून आगामी पाच वर्षात विजेचे बिल घ्यायचे नाही, हा निर्धार कायम आहे. शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यासाठी अर्थसंकल्पावर सध्या १५ हजार कोटी रुपयांचा भार पडतो तेवढेच पैसे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे वाचणार आहेत. सध्या आठ रुपये प्रतियुनिट दराने मिळणारी वीज शेतकऱ्यांना दीड रुपये प्रती युनीट दराने उपलब्ध केली जाते. आता हे बिलही सरकार भरते. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत तीन रुपये प्रति युनिट दराने वीज मिळणार असल्याने वीज खरेदीत दहा हजार कोटी रुपये वाचतील. तसेच अनुदान आणि क्रॉस सबसिडीच्या पाच हजार कोटी रुपयांची बचत होईल. परिणामी २०२६ पर्यंत शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासोबतच त्यांच्या मोफत वीज योजनेचे पैसेही मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे वाचणार आहेत.

# अमित शहा यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ सोलापूर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने धरणे आंदोलन

## धरणे आंदोलननंतर जिल्हाधिकारी यांना निवेदन; मारेकऱ्या वर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून अटक करावी अशी मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : आत्ता एक फॅशन झाली आहे की, आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर म्हणायची, इतक्या वेळा जर देवाचा नाव घेतलात तर स्वर्ग मिळेलअश्या प्रकारे संसद मध्ये विधान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल केलेल्या मुळे वंचित बहुजन आघाडी सोलापूर शहर व जिल्हा वतीने जिल्हा अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद पूनम गेट समोर एक दिवसीय भव्य धरणे आंदोलन घेऊन जाहीर निषेध करण्यात आला. आंबेडकरांचा श्वास आहे शेवटच्या क्षणापर्यंत फक्त या देहातून आंबेडकरच निघेल तुझा स्वर्ग तुम्हाला लखलाभ असू दे,, अशा प्रकारची घोषणा देऊन सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते अमित शहा माफी मांगो अशा प्रकारची घोषणा देऊन धरणे आंदोलन झाल्यानंतर माननीय जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. आंदोलनाच्या पूर्वी परभणी येथे पोलिसांच्या अत्याचारात शहीद झालेले सोमनाथ सूर्यवंशी यांना वंचित बहुजन आघाडी सोलापूर जिल्ह्याच्या वतीने श्रद्धांजली वाहून त्यांच्या मारेकऱ्या वर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करावी अशा प्रकारचे मागणी जिल्हाधिकारी यांना निवेदन द्वारे करण्यात आली.

याप्रसंगी वंचित बहुजन आघाडी शहर व जिल्ह्यातील सर्व विभागाच्या पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बा भिमा तुझ्या जन्मामुळे उद्धारली कोटी कुळे




**अक्कलकोट तालुक्याचे सुपुत्र डॉ. अरुण अशोक सोनकांबळे युपीएससी परीक्षा उत्तीर्ण केंद्रीय मंत्रालयात निवड**

अक्कलकोट तालुक्यातील अगदी ग्रामीण भागा किणी या खेड्यातून आलेले एक शेतकऱ्यांचा मुलगा एक व्यवसाय मूलमोजरी करून खाणाऱ्या सर्वसामान्य माणसांचा मुलगा समाजाला मान सन्मान उंचावणारी गोष्ट समाजातील तळागाळापर्यंत जाऊन काम करण्याची संधी शोधत असताना उंच भरारी घेण्याचं ध्येय मनाशी बाळगून प्रत्येक संकटांना तोंड देत आलेल्या प्रत्येक संघर्षाला न घाबरता निर्भीडपणे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार लोकांसमोर प्रकटपणे मांडत लोकांना प्रबोधन करत शिक्षणाचे महत्व अगदी घरापासून ते पूर्णपणे ग्रामीण भागातील खेड्यापाड्यांमध्ये जाऊन डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवण्याचं काम कॉलेजचे शिक्षण घेत असताना करण्यात आले लोकांना बाबासाहेबांचे विचार आचारण्यात कसे आणावं त्यावर विचार विनिमय कसे करावे बाबासाहेबांनी आंबेडकरांनी दिलेले संवैधानिक अधिकार या सर्व गोष्टीचा विचार करून आपल्या घरची परिस्थिती कमकुवत असताना सुद्धा परिस्थिती हालाखीची आहे म्हणून न डगमगता अगदी आई-वडिलांसोबत शेतामध्ये काम करून स्वतःचे शिक्षण पीएचडी पूर्ण करून सातारा वाई सारख्या शहरांमध्ये प्राध्यापक या पदावर ती असून सुद्धा शिक्षणात शिक्षण घेण्याचा प्रवास कधीच थांबवला नाही अगर आप Failure को Attention नहीं देंगे तो आपको कभी भी Success नहीं मिलेगी। तळागाळातील लोकांनामध्ये जाऊन काम करायचं आहे सामाजिक राजकीय धार्मिक सामाजिक संस्कार सामाजिक सलोखा या सर्व गोष्टी अगदी वयाच्या १७व्या वर्षापासूनच सर्वसामान्य लोकांच्या मूलभूत गरजा वर काम करताना लोकांना प्रबोधन करताना अगदी ग्रामीण भागातील प्रत्येक अज्ञान लोकांना शिक्षणाचा महत्व सांगत असत आणि शिक्षणाशिवाय आपल्या कडे पर्याय नाही उंच जर भरारी घ्यायचे असेल तर शिक्षणच ह्या सर्व गोष्टी स्वतःच्या मनामध्ये ध्येय ठेवून आज समाजातील प्रत्येक तळागळातील लोकांची मान उंचावणारी गोष्ट आणि तालुक्यातून प्रथमच घडली हे खूप अभिमान स्पद आणि इतर तरुणांना प्रेरणादायी प्रवास आहे कारण आपल्या हक्काचा माणूस प्रशासकीय अधिकारी मध्ये जातोय त्यावेळेस आपल्या समाजातील अनेक मूलभूत गरजा वरती काम तो करत असतो जो राजकीय मंत्रा नेत्या आमदार खासदार यांच्याकडे ताकद नसते तेवढी ताकद या प्रशासकीय अधिकारी कडे असते आणि त्या ठिकाणी आपल्या हक्काचा माणूस अगदी ग्रामीण भागातील शेतकरी मोलमजुरी करून खाणारा एक आईवडिलांचा मुलगा बाबासाहेबांचा अनुयायी सामाजिक भान असणारा, सामाजिक सोलोखा जपणारा, सामाजिक प्रबोधन करून लोकांना जागृत करणारा, आपल्याकडे काही नसताना शिक्षणाचे महत्व लोकांना स्वतःच्या स्वखर्चाने जाऊन प्रत्येक गावामध्ये जाऊन जयंतीच्या निमित्ताने लोकांमध्ये जाऊन प्रबोधन करणारा एक आदर्श असे आधार पूर्वक असं वाटणार एक व्यक्तिमत्व एक प्रशासकीय अधिकारी प्राध्यापक डॉक्टर अरुण अशोक सोनकांबळे सरच आहेत इतक्या प्रशासकीय अधिकारी असून सुद्धा कोणताही इगो नाही, बाबासाहेबांनी दिलेल्या अधिकार हक्क मूलभूत गरजा संविधान आणि मी आज जे आहे ते फक्त आणि फक्त बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच आहे एक छाती ठोकून सांगणारे एक व्यक्तिमत्व म्हणजे फक्त अणि फक्त एक ज्वालामुखी तुम्हीच आहात आणि या ठिकाणी खास अभिमान वाटतो की तुम्ही माझे खास मित्र आहात यापुढे सुद्धा आपल्या हातून असं सामाजिक सलोखा जपणारा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणारा समाज घडवण्यासाठी आपण नेहमी कटिबद्ध आहात यांत शंकाच नाही सर .....



**– अविनाश सोपान गायकवाड**



## कथा तीन समाजरत्नांची...!

पुरंदर/प्रतिनिधी : सातारा येथे असताना गाडगेबाबांची प्रकृती साथ देत नव्हती. तेव्हा बाबांनी आर्वजून डॉ. आंबेडकरांना भेटीचा निरोप पाठाविला. निरोप मिळताच आंबेडकरांनी आपली कामे बाजूला ठेवून सातारा गाठले. आंबेडकरांना पाहताच गाडगेबाबांना खूप समाधान वाटले. त्यानी आपल्या उशिखालून कांही दस्त काढले. ते आंबेडकरांच्या हातात देत बाबा म्हणाले, सायबा ही लाख मोलाची दौलत हाय. तवा ही दौलत योग्य माणसाच्या हातात देऊन मी मोकळा होणार आहे. म्हणून सायबा तुला बोलावलो बघ. हे दस्ताची योग्य पुर्तता केल्याली हाय तवा ही दौलत तुझ्याकड दिलो तर मी मोकळा.

'आंबेडकरानी' दस्तऐवज पाहिला तर त्यांना आश्चर्य वाटले कारण तो दस्त सातारा येथिल जमिनीचा होता. त्या सर्व जमिनीचे सर्व अधिकार गाडगेबाबांनी आंबेडकरांना दिले होते. दान मिळालेल्या जमिनीचा योग्य कामासाठी वापर व्हावा हिच बाबांची इच्छा ओळखून आंबेडकरानी कर्मवीर भाऊराव पाटलांना निरोप दिला आणि ती सर्व जमिन आंबेडकरांनी गाडगेबाबांच्या समक्ष रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर आण्णा यांना (भाऊराव पाटील) बहाल केली.

**संत गाडगेबाबा यांचे पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन**

# संविधान विटंबनाप्रकरणी शासकीय व निमशासकीय सेवानिवृत्ती कर्मचारी संघटनेचे निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सडक अर्जुनी: परभणी येथील स्टेशन रोड भागातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयालगत संविधानाची सिमेंटपासून बनविलेली प्रतिकृती असून तिला काचेचे आवरण होते. दि. १० डिसेंबर २०२४ ला एका माथेफिरुने संविधान प्रतिकृतीचे काच फोडून विटंबना केली. त्यामुळे सदर घटनेचा निषेध करीत संविधान प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्या माथेफिरुवर कडक कारवाई करण्यात यावी. तसेच संविधान प्रतिकृतीच्या विटंबनेनंतर झालेल्या हिंसाचार प्रकरणात अटकेत असलेल्या सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी (वय - ३५, रा. शंकरनगर, परभणी) या एल. एल. बी. चे शिक्षण घेणाऱ्या युवकाचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला. त्याचप्रमाणे जेष्ठ आंबेडकरवादी कार्यकर्ते विजय वाकोडे यांच्यावर पोलिसांनी अनेक गुन्हे दाखल केल्यामुळे त्यांचा हृदयविकाराच्या धक्क्यामुळे दुःखद निधन झाले.सदर दोन्हीही मृत्यू प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधित दोषी पोलीस अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी.अशी मागणी शासकीय व निमशासकीय सेवानिवृत्त कर्मचारी संघटना तालुका सडक अर्जुनीच्या वतीने करण्यात आली असून तसे निवेदन तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन यांना शुक्रवारी (ता. २०) पाठविण्यात आले आहे. नायब तहसीलदार जगदीश जांभुळकर यांना निवेदन देतांना अनिल मेश्राम, आर. व्ही. मेश्राम, दिलीप राऊत, अशोक गजभिये, भोजराज रामटेके, शाम राव बडोले, प्रा.राजकुमार भगत, आदी उपस्थित होते.



**डॉक्टरांच्या अहवालातुन प्रकार उघडकीस**

**अंढेरा पोलीस स्टेशनला मर्ग दाखल**

# भरोसा-देऊळगाव घुबे रोडवरील दुचाकीस्वाराचा मृत्यू रोहीच्या धडकेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे/चिखली तालुका प्रतिनिधी : अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या चिखली तालुक्यातील देऊळगाव घूबे - भरोसा या मार्गावर शेतातील कामे आटोपून घराकडे मोटार सायकलवर परत जात असताना एका अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली त्यामध्ये मोटार सायकल चालकाचा रोडवर पडून मृत्यू झाल्याची घटना दिनांक १७ डिसेंबर रोजी भरोसा ते दे.घुबे रोडवर सकाळी उघडकीस आली होती.सदर घटनेत पोलिसांनी प्रेताचे पोस्टमार्टम केले असता सदर तरुणाचा मृत्यू हा अद्यात वाहनाने नसून रोही जणांवराच्या धडकेने झाल्याचे निष्पन्न झाले आहे.अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या मेरा खुर्द येथील शरद श्रीहरी ठाकूर वय ४६ वर्ष यांनी पोलीस स्टेशनला लेखी स्वरूपात माहिती दिली की.मेरा खुर्द येथील राहीवाशी असलेले पवन सुनिल ठाकूर वय ३६ वर्ष यांचे शिक्षण बीएबीएड झालेले असून त्यांची पत्नी जाफ्राबाद येथे नगर पालिका मध्ये नौकरी करते.त्यांची शेती मेरा खुर्द येथे असल्याने ते शेती कामासाठी मेरा खुर्द येथे ये जा करत होते. दिनांक १७ डिसेंबर रोजी शेतातील कामे आटोपून तो जाफ्राबाद गावाकडे स्वतः च्या मोटार सायकलवर जात असताना एका अज्ञात वाहन चालकाने मोटार सायकलला जोरदार धडक दिली. रात्रीची वेळ असताना बराच वेळ पवन ठाकूर हे जखमी अवस्थेत रोडवरच तडफडत होते. परंतु काही वेळाने रस्त्यावरूण काही वाहन जात असताना त्यांनी रोडवर पडलेला व्यक्ती पाहला आणि एका पाठोपाठ आठ दहा जण गोळा झाले मात्र तेवढ्यात त्याठीकाणी मेरा खुर्द येथील बाळू वराडे हे जात होते तेव्हा त्यांनी जखमी तरुणाला पाहुण सदर तरुण हा गावातीलच आहे म्हणून त्यांनी लगेच जखमीला एका वाहनात टाकून चिखली येथे रुग्णालयात हलविले.परंतु डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले होते.या घटनेची माहिती लगेच त्यांनी त्यांच्या नातेवाईकाना दिली. हा मृतक आई वडिलांचा एकूलता एक मुलगा होता व मृतक मुलाला दोन मुली आहेत. अज्ञात वाहनाच्या धडकेने मृत्यू झाल्याची चर्चा चालू असतानाच पोलिसांनी सदर मृतकाचा पोस्टमार्टम करुण डॉक्टरराकडून अहवाल घेतला असता सदर तरुण हा अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झालेला नसून तो रोही जणांवराच्या धडकेनने दगावला असे निष्पन्न झाले आहे ,असे अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील यांनी सांगितले यावेळी मृतकाचे नातेवाईक शरद श्रीहरी ठाकूर वय ४६ वर्ष यांच्या लेखी जबाब वरून डायरी अंमलदार आंधळे यांनी कलम१९४ नुसार मर्ग दाखल केला या घटनेचा पुढील तपास बिट अंमलदार कैलास उगले यांच्याकडे सोपावीला आहे.



# अमित शहा यांचा वंचित बहुजन आघाडी व भारतीय बौद्ध महासभा यांच्यावतीने जाहीर निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

करमाळा/प्रतिनिधी : लोकसभेच्या हिवाळी अधिवेशनात देशांचा गृहमंत्री अमित शहा यांनी जे विश्व भूषण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल बेताल वक्तव्य केले होते त्यांच्या निषेधार्थ आज करमाळा तहसील कार्यालय समोर वंचित बहुजन आघाडी व भारतीय बौद्ध महासभा यांच्यावतीने निषेध आंदोलन करण्यात आले .

या आंदोलनात प्रमुखांनी मागणी करण्यात आली की त्याचं मंत्री पदावरून दूर करावे व समस्त बहुजन समाजाची माफी मागावी अशा असायचे मागणी करण्यात आली यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सुभाष ओव्हळ शहाराध्यक्ष विशाल लोंढे भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष प्रशांत कांबळे भारतीय बौद्ध महासभेचे ता उपाध्यक्ष महाराजा कांबळे भारतीय बौद्ध महासभेचे ता सचिव संतोष ह कांबळे व बहुजन हक्क परिषदेचे तालुका अध्यक्ष प्रवीण कांबळे बाबासाहेब गरड भिमदल सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनील भोसले कंदर ग्रामपंचायत सदस्य दिपक घोडकोस वंचित बहुजन आघाडी चे तालुका संघटक शिवाजी भोसले अभिमान ओव्हळ सचिन घोडके शहर उपाध्यक्ष यशवंत कांबळे उपाध्यक्ष जितेश रणबागूल आदी कार्यकर्ते उपस्थित होते




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# बँक ऑफ बड़ोदा शाखा बारामती शाखेचे मॅनेजर व इतर कर्मचाऱ्यांवरती अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अन्वये कलम अॅट्रॉसिटी अॅक्टनुसार गुन्हा दाखल

## आम्ही उच्च जातीच्या लोकांना कर्ज देतो, खालच्या जातीच्या लोकांना एवढे कर्ज देत नाही; दैनिक यश सिद्धी न्यूज च्या बातमीची प्रशासनाने घेतली दखल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बारामती/ प्रतिनिधी: अतुल सोनकांबळे

उज्वला महेद्र गायकवाड यांच्या निवेदनाची दखल घेत अखेर अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधित अॅट्रॉसिटी क्टनुसार बँकेचे मॅनेजर व इतर कर्मचारी वरती गुन्हा दाखल करण्यात आलाआहे.

उज्वला महेद्र गायकवाड माझे मनिरत्न गारमेंट नावाचे शॉप बसस्टॅड बारामतीजवळ असुन ते चालवुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आसतात.

त्यांच्यावरती झालेल्या अन्यायाविरोधात दैनिक यशस्वी न्यूज या दैनिकात बातमी प्रकाशित झाली होती या बातमीची दखल घेत अखेर बँक ऑफ बडोदा बारामती शाखेचे मॅनेजर व इतर त्यांच्यावरती अखेर अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधित अॅट्रॉसिटी अॅक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सन २०१४ मध्ये मी बँक ऑफ बड़ोदा शाखा बारामती येथे जिल्हा उद्योग केंद्रव्दारे ५ लाख रु लोन घेण्यासाठी अर्ज केला होता. त्याप्रमाणे बँक ऑफ बडोदा यांनी मला दि. १७/०३/२०१५ रोजी ५ लाख रु कर्ज व्यवसायासाठी मंजुर केले त्यामध्ये १ लाख ८० हजार रु. शिलाई मशिन खरेदी करणेसाठी व बाकी ३ लाख रुपये मटेरीयल घेण्यासाठी सीसी दिली. त्यापैकी १ लाख १८ हजार रु मला जिल्हा उद्योग केंद्रातुन सबसिडी मिळाली.

सदर कर्ज एकुन १लाख ८० रु व्याजासह मी दि. २०/०९/२०१६ रोजी बँकेमध्ये भरले. व ३ लाख रु ची सीसी चालु ठेवली. त्यावेळी बँकेने मला दि. २१/०९/२०२१६ रोजी निल प्रमाणपत्र दिले. त्यानंतर मी माझा व्यवसाय वाढविण्यासाठी सदर ३ लाख रु सीसी चा व्यवहारामध्ये वापर केला. त्यानंतर सन २०१७ मध्ये माझा व्यवसा वाढला असल्याने मला जास्त पैशाची आवश्यकता असल्याने मी बँकेला २ लाख रु सीसी वाढवुन देणेबाबत विनंती केली असता बँकेने मला २ लाख रु सीसी वाढवुन दिला त्यामुळे माझे एकुण ५ लाख रु सीसी झालेले होते. त्यानंतर सन २०१९ पर्यंत माझा व्यवसाय ठिक चालु असल्याने बँकेमधील सीसीचे पैसे काढुन ते मी वेळेवर बँकेमध्ये भरत होते. त्यानंतर करोना महामारी चालु झाल्याने माझा व्यवसाय बंद पडला व मी बँकेकडुन घेतलेले ५ लाख रु वेळेवर बँकेमध्ये भरु शकले नाही. त्यानंतर सन २०२१ पासुन करोना संपल्यानंतर मी बँकेला पैश्याचे व्यवहार सुरळीतपणे चालु ठेवला. सन २०२२ मध्ये मी बँकेला हारवेस्टर घेण्यासाठी कर्जाची मागणी केली त्यावेळी बँकेचे मॅनेजर तिकडुन बँकेमध्ये ५ लाख रु भरले व माझेकडे असलेले सी.सी.चे कर्ज निल केले तसेच कर्जावर असलेले एकुण व्याज ३ लाख रु असे झालेले होते. त्यापैकी मी दि.०९/०३/२२ रोजी १ लाख रु व दि. ०५/०४/२२ रोज ९५ हजार तसेच दि. ०८/०४/२२ रोजी १ लाख रु भरले असे सर्व व्याज मी भरलेले आहे. त्यानंतर हारवेस्टरला लागनारे कागदपत्रे यांची पुर्तता मी केली. तसेच प्रोजेक्ट रिपोर्ट तयार केला. त्यानंतर सर्व कागदपत्रे घेवुन मी बँकेत गेले तेव्हा बँकेचे मॅनेजय श्री ललीत नाळे यांनी मला उडवाउडवीची उत्तरे दिली. व मला विनाकारण बैंकेत बसुन ठेवत होते. त्यानंतर मला समजले की, बँकेचे मॅनेजर श्री ललीत नाळे यांनी माझे सीसी चे अकाउंट बंद करुन ठेवले त्यामुळे मला त्यामधुन व्यवहार करता आले नाही. त्यानंतर दि. १५/०४/२२ मी ललीत नाळे याना भेटण्यास गेले.

तसेच १६/०४/२२ मी पुन्हा बँकेचे मॅनेजर श्री ललीत नाळे यांना भेटण्यासाठी गेले त्यावेळी माझेसोबत रामचंद्र नामदेव कांबळे रा. शिराळा, ता. परांडा जि. उस्मानाबाद हे हजर होते. त्यावेळी मी ललीत नाळे यांना विचारले की, मला हारवेस्टर घेणेसाठी कर्ज का देत नाही. त्यावेळी ललीत नाळे हे मला म्हणाले की, आम्ही उच्च जातीच्या लोकांना कर्ज देतो, खालच्या जातीच्या लोकांना एवढे कर्ज देत नाही. त्यावेळी मी त्यांना म्हणाले की, तुम्हाला कर्ज द्यायचे नव्हते तर मला तुम्ही सर्व प्रोसीजर करायला का लावले. त्यानंतर मी त्यांचेकडे सीसी चे पैसे काढण्यासाठी बँकेत गेले असता त्यांनी मला सांगितले की तुमचे खाते आम्ही एन.पी.ए. मध्ये ब्लॉक केले आहे. त्यानंतर त्यांनी मला कागदपत्रांची पुर्तता करणेसाठी सांगीतले, असता मी बँकेला अर्ज केले व माझे खाते चालु करणेबाबत विनंती केली परंतु त्यांनी माझे खाते सुरु केले नाही.

बँक ऑफ बडोदा शाखेचे मॅनेजर व इतर कर्मचाऱ्यांनी मला जाणून बुजून त्रास दिल्याने मी आमरण उपोषण करणार असे निवेदन दिले होते परंतु दैनिक यशस्वी न्यूज पेपरच्या बातमीची दखल घेत मला उपोषण करण्यापासून परावर्तित करून अखेर आज बँकेचे मॅनेजर व इतर कर्मचाऱ्यावरती गुन्हा दाखल करण्यात आला.

## थोडक्यात...

### बक्षीसपत्र नोंदणी वेळी फसवणूक; सहा जणांवर गुन्हा दाखल

सोलापूर : बक्षीस पत्र करतेवेळी नोंदणीच्या दरम्यान बायोमेट्रिकवर अंगुली मुद्रा न देता परस्पर जाऊन कटकारस्थान केल्याप्रकरणी बोंडरायटर याच्यासह ६ जणांवर सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची हकीकत अशी की, गंगाधर लक्ष्मीपती देवसानी (रा.न्यू पाच्छा पेठ,सोलापूर) याने बोंडरायटर गणेश पेंटा (रा.सिद्धेश्वर पेठ,सोलापूर) याला हाताशी धरून एकत्र कुटुंबातील मिळकतीचे वाटप करताना तीन बक्षीस पत्रावर सर्व कुटुंबीयांच्या स्वाक्षऱ्या करून ते दस्त उत्तर कार्यालय क्रमांक ३ येथे नोंदवण्यास दिले. नोंदणीच्या वेळी बक्षीस पत्राच्या अगोदर जाणून-बुजून संशयित आरोपी गंगाधर लक्ष्मीपती देवसानी यांनी दामोदर लक्ष्मीपती दिवसानी, अमित दामोदर दिवसानी,अनिल दामोदर देवसानी,निर्मला दामोदर देवसानी (रा.सर्वजण विणकर वसाहत,अक्कलकोट रोड,सोलापूर) यांना हाताशी धरून ही मिळकत फिर्यादी अर्चना श्रीधर देवसानी (रा.न्यू पाच्छा पेठ, सोलापूर) यांच्या नावाने न करण्याच्या उद्देशाने नोंदणी दस्त वेळी अंगुलीमुद्रा न देता परस्पर निघून कटकारस्थान केले. आणि फसवणूक केली. अशी फिर्याद अर्चना देवसानी यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली असून ६ जणावर गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक लकडे हे करत आहेत.

### चोरट्याने पळविला मोबाईल

सोलापूर : वालचंद कॉलेज रोडवर थांबले असता अज्ञात चोरट्याने मोबाईल चोरून नेल्याची घटना १७ नोव्हेंबर रोजी घडली. याप्रकरणी विनोद व्यंकटेश वडलाकोंडा (वय-२३,रा.नवीन विडी घरकुल) यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोह.माने हे करीत आहेत.

## श्री संत दामाजी साखर कारखान्याचे चालू गळीत हंगामात २९ दिवसात एक लाख मेट्रिक टन गाळप पूर्ण : चेअरमन शिवानंद पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळवेढा येथील श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे चालू बळीत हंगाम २०२४ /२५ मध्ये २९ दिवसात एक लाख मेट्रिक टन ऊस गाळप शुक्रवार दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी पूर्ण झाल्याची माहिती कारखान्याची चेअरमन श्री शिवानंद यशवंत पाटील यांनी तसेच सरासरी साखर उतारा ९/३२ टक्के असा मिळाला आहे सर्व सभासद, ऊस उत्पादक ऊस पुरवठा करणारी शेतकरी ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार, मजूर अंतर्गत ठेकेदार, कारखान्याचे सर्व खाते प्रमुख विभाग प्रमुख व कर्मचारी,

सर्वांच्या योगदानातून इतक्या कमी दिवसात दामाजी कारखान्याचे एक लाख गाळप पूर्ण केलेली आहे ऊस तोडणी यंत्रणा पूर्ण क्षमतेने भरलेली कारखान्याचे रोज सरासरी ३७००/३९०० मॅट्रिक टन प्रतिदिन प्रमाणे गाळप होत आहे

चालू गळीत हंगामामध्ये पाच लाख मीटर गाळपाचे उद्दिष्ट ठेवून गाळपाचे उद्दिष्ट ठेवून तयारी केली आहे कारखान्याचे सर्व सभासद नोंदणी आपला ऊस दामाजी कारखान्याचे गणितांसाठी देऊन प्रगतीसाठी योगदान द्यावे संचालक मंडळाने ठरवलेल्या गाळपाचे उद्दिष्ट निश्चितच पूर्ण करणार असल्याचे विश्वास व्हाईस चेअरमन श्री तानाजी भाऊ खरात यांनी सदर प्रसंगी व्यक्त केला.

याप्रसंगी संचालक सर्वश्री मुरलीधर दत्तू गौरीशंकर गुरुकुल, गोपाळ भगरे, राजेंद्र काका पाटील भारत बेंद्रे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिद्ध लिगाडे, भिवा दोलतोंडे बसवराज पाटील, धोंडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लंगोटे, तानाजी कांबळे, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर, प्रा कार्यकारी संचालक रमेश जायभाय खाते प्रमुख विभाग प्रमुख उपस्थित होते.

## घोळसगाव येथील जिल्हा परिषद प्रा. मराठी शाळेचे क्रिडा स्पर्धेत घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट पंचायत समिती शिक्षण विभाग यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये बुद्धिबळ खेळामध्ये घोळसगाव येथील जिल्हा परिषद मराठी शाळेने घवघवीत यश मिळविले आहे.

अक्कलकोट मधील फत्तेसिंह क्रीडा संकुलामध्ये घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय स्पर्धेमध्ये बुद्धिबळ या खेळात घोळसगाव येथील जिल्हा परिषद मराठी शाळेतील इयत्ता सातवी मधील विद्यार्थिनी कु. गायत्री शिवानंद किवडे हिने तृतीय क्रमांक मिळवला.

अक्कलकोट तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री. आरबाळे साहेब यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि मेडल देऊन विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला त्यामुळे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष ,उपाध्यक्ष व सदस्यांनी शाळेतील विद्यार्थिनी व सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.



### डॉ. बाबासाहेब का अपमान नही सहेगा हिंदुस्थान, अमित शहा माफी मांगो, घोषणा देत मैं भी आंबेडकर प्रतिमा हातात घेऊन खासदार प्रणिती शिंदे सह इंडिया आघाडी खासदारांचा सहभाग

नवी दिल्ली : गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केला. याविरोधात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे जी, विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी, खासदार प्रियांकाजी गांधी यांच्या नेतृत्वात अमित शहा यांनी माफी मागावी, पंतप्रधान नरेंद्र मोदींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल सन्मान असेल तर अमित शहा यांना ताबडतोब मंत्रिमंडळातून काढून टाकावे या मागणीसाठी मैं भी आंबेडकर असे प्रतिमा घेऊन संसदेच्या कंपाऊंड वर चढून आक्रमक होऊन आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात इंडिया आघाडीचे खासदार सहभागी झाले होते.

## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात डुबेरे येथील जनता विद्यालयाचे घवघवीत यश; तीन उपकरणाची जिल्हा पातळीवर निवड

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी:- शिक्षण विभाग पंचायत समिती व तालुका विज्ञान - गणित अध्यापक संघ आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने घवघवीत यश प्राप्त करून वर्चस्व निर्माण केले.

प्राथमिक गट दिव्यांग विद्यार्थी वैज्ञानिक उपकरण यामध्ये स्वरांजली नवनाथ सहाणे व प्रणिती योगेश कडभाने यांनी प्रथम क्रमांक मिळविला . यांनी पाणीबचत याविषयावर उपकरण आधारित सादर केले होते.

खुला प्राथमिक गटात प्रणव पावशे , सार्थक वारुंगसे व विवेक कुंदे यांनी मिठापासून वेल्डिंग मशीन तयार करणे या विषयावर उपकरण सादर करून द्वितीय क्रमांक मिळविला.

शिक्षक शैक्षणिक साहित्य निर्मिती यामध्ये गणिती मॉडेलिंग आणि संगणकीय विचार या विषयावर विद्यालयाचे गणित



शिक्षक रेवणनाथ कांगणे यांनी माध्यमिक गटात प्रथम क्रमांक मिळविला. या तिन्ही उपकरणांची जिल्हास्तरीय विज्ञान स्पर्धेसाठी निवड झाली आहे .

तसेच प्रयोगशाळा परिचर गटात किशोर बाजीराव शिंदे यांनी तयार केलेल्या दृष्टी सातत्य हया शैक्षणिक साहित्यास तृतीय क्रमांक मिळवला.

विद्यार्थ्यांना उपक्रमशील मुख्याध्यापक रामदास वाजे , विज्ञानशिक्षक डी. ए. रबडे, रेवणनाथ कांगणे, सोमनाथ पगार, पी.आर. करपे , सुनील ससाणे यांचे मार्गदर्शन लाभले. सहभागी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचा शालेय समितीचे अध्यक्ष नारायण शेठ वाजे ,विठ्ठल तात्या वामने,विजय दादा वाजे , माजी सरपंच शरद माळी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .

यावेळी बोलताना नारायण शेठ वाजे म्हणाले की , विद्यार्थ्यांनी मेहनत , कष्ट घेतल्यास हमखास यश मिळते. विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन यश संपादन करावे. विद्यार्थ्यांनी व विद्यालयाने चार पारितोषिक मिळून तालुक्यातील विज्ञान प्रदर्शनात वर्चस्व निर्माण केले आहे. विज्ञान प्रदर्शनाचे सर्व नियोजन डी. ए.रबडे यांनी केले होते. विद्यालयाने मिळवलेल्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ड. नितीन ठाकरे ,तालुका संचालक कृष्णाजी भगत ,संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ.भास्करराव ढोके, शालेय समितीचे अध्यक्ष नारायणशेठ वाजे ,उच्च माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष विठ्ठल तात्या वामने, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सोमनाथ वारुंगसे, मुख्याध्यापक रामदास वाजे आदींसह शालेय समितीचे सदस्य, शिक्षक पालक संघ सदस्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी केले आहे.

### दोन टिपर व एक पिक अप जीप जप्त

### तहसिलदार सचिन लंगुटे यांची माहिती

## अवैध वाळू वाहतुकीवर महसूल प्रशासनाची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. तालुक्यात महसूल विभागाच्या भरारी पथकाव्दारे गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील भीमा नदीपात्रात अवैध वाळू उत्खनन व वाहतुक करण्यासाठी वापरण्यात येणारे दोन टिपर व एक पिक अप जीप अशी ३ वाहने जप्त करण्यात आली असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.



पंढरपूर तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इतापे व तहसिलदार सचिन लंगुटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी गोपाळपूर येथील भीमा नदी पात्रात अवैध वाळू वाहतुक करण्यासाठी वापरण्यात येणारे दोन टिपर व एक पिक अप जीप अशी ३ वाहने जप्त करण्यात आली असून, सदर वाहने शासकीय धान्य गोदाम पंढरपूर येथे लावण्यात आली आहेत.

या भरारी पथकात मंडळ अधिकारी विजय शिवशरण, राजेंद्र वाघमारे, पंकज राठोड, ग्राम महसूल अधिकारी साईनाथ अडगडाळे, पियुष भोसले, प्रमोद खंडागळे, महेश सावंत, गणेश पिसे, संजय खंडागळे, समीर पटेल, मंगेश बनसोडे, रविकिरण लोखंडे, पी. पी. कोईगडे, आर बी खंदारे व पंढरपूर तालुका ग्रामीण पोलीस स्टेशनचे अधिकारी सहभागी होते.

## स्वच्छतेचे पुजारी संत गाडगेबाबा यांना अभिवादन



**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

कळंब : सुधाकर रणदिवे, दि.२० तालुक्यातील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा मळकरंजा येथे संत गाडगे महाराज यांना अभिवादन करण्यात आले यावेळी शाळेतील सहशिक्षक श्री.हनुमंत रामभाऊ घाडगे यांनी गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला असे मंत्रमुग्ध भजन गात संत गाडगेबाबा यांच्या जीवन कार्याचा परिचय उपस्थित विद्यार्थ्यांना करून दिला. गाडगे महाराज आणि स्वच्छता यांचे नाते व राज्य सरकारने मागील काही वर्षांपूर्वी स्वच्छतेचे महत्व सांगणारी राज्यस्तरीय ग्राम स्वच्छता अभियान याबद्दलही विद्यार्थ्यांना अवगत करून स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगितले. यावेळी शाळेतील मुख्याध्यापक श्री संतोष भोजने यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक श्री संजय ओव्हाळ, श्रीमती भारती सूर्यवंशी व मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी कुमारी मंजुश्री कराड यांनी परिश्रम घेतले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### अज्ञात चोरट्याने पळविला ६७ हजारांचा ऐवज

सोलापूर : शांती चौक, अक्कलकोट नाका येथे अक्कलकोटला जाणार्या बसमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने ६७ हजार १५० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना २० डिसेंबर रोजी घडली. याप्रकरणी लक्ष्मीबाई अनिल मुलगे (वय-४०,रा.कीर्ति नगर, अक्कलकोट रोड) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल बाबर हे करीत आहेत.

### शेजारच्या गच्चीवरून घरात उडी मारून केली चोरी

सोलापूर : शेजारी राहणाऱ्या घराच्या गच्चीवरून फिर्यादीच्या घरावर उडी मारून घरात प्रवेश करून घरातील किमती साहित्य चोरून नेले. अजय कुमार झारखंडे (वय-४७,रा. मार्कंडेय नगर,कुमठा नाका,सोलापूर) यांनी सोलापुरातील भाग्यलक्ष्मी पालखी येथे पार्क येथे रविशंकर पॅराडाईज मध्ये नवीन घर घेतले होते.१८ डिसेंबर रोजी अज्ञान चोरट्याने गच्चीवरून घरात उडी मारून घरातील जवळपास ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार भिसे हे करीत आहेत.

# पंढरपूर नगरपालिकेच्या दिशेने अभिजीत पाटलांची विधानसभेत साखर पेरणीला सुरूवात

## पंढरपूरच्या अनेक प्रश्नांवर आमदार अभिजीत पाटलांनी फोडली वाचा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर आणि माढा विधानसभा मतदारसंघातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लागावेत यासाठी नवनिर्वाचित आमदार अभिजीत पाटील यांनी सदस्य पदाची शपथ घेतल्यापासून शर्तीचे प्रयत्न सुरू केले आहेत.

बोले तैसा चाले या उक्तीप्रमाणे त्यांनी मतदार संघातील जनतेच्या प्रश्नांसाठी आमदार अभिजीत पाटील यांनी सकाळी साडेनऊ वाजले पासून जेवण न करता रात्री नऊ वाजेपर्यंत सभागृहात थांबून कळकळीने प्रश्नांची मांडणी केली. यातूनच त्यांचे कर्तृत्व सिद्ध होते.

नागपूर येथे पार पडत असलेल्या हिवाळी अधिवेशनात सलग तिसऱ्या दिवशी आमदार अभिजीत पाटील यांनी 'अध्यक्ष महोदय' असे म्हणत विधान भवनात पंढरपूर, माढा मतदार संघातील प्रश्नांवर गर्जना केली.

यावेळी त्यांनी माढा मतदार संघाबरोबरच

**■ आमदार अभिजीत पाटील यांचेकडून माढा बरोबरच पंढरीच्या विकासाचाही पाठपुरावा**

**■ पंढरपूरच्या विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवीत, अधिवेशनात केली निधीसाठी सरकारला विनंती**

पंढरपूरच्या अनेक प्रश्नांवर वाचा फोडल्याने पंढरपूर नगरपालिकेची साखर पेरणी केल्याचे दिसून आले.

यावेळी त्यांनी टेंभुर्णी नगरपंचायत संदर्भात अंतिम अधिसूचना काढण्यात यावी. माढा नगरपंचायत मधील जिल्हा परिषदेच्या जागेत शॉपिंग कॉम्प्लेक्स साठी निधी उपलब्ध करून दिल्यास या ठिकाणी व्यवसाय सुरू होऊ शकतील. तसेच शाळेसाठी कंपाउंड वॉल करावे, माढा तहसील कार्यालयाच्या फर्निचर साठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

माढा शहरातील प्ले ग्राउंड गार्डनसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

माढा शहरांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, अण्णाभाऊ साठे, अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

नाट्यगृह, एसटीपी प्लांट, माढेश्वरी देवी तीर्थक्षेत्रासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा. पंढरपूर नगरपालिका मधील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरांसाठी नागरिकांनी पैसे भरले असून २०२१ पासून काम बंद आहे, त्याबाबत तात्काळ दखल घेऊन कार्यवाही करण्यात यावी.

पंढरपूर नाट्यगृह बांधकामातील भ्रष्टाचाराविषयी सखोल चौकशी करण्यात यावी.

महाराष्ट्रातून तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूर येथे वारकरी येतात श्रद्धास्थान असलेल्या चंद्रभागेत स्नान करतात परंतू शहरातील सोडण्यात येणारे घाण पाणी चंद्रभागेच्या नदी पात्रात जाते. या पाण्यावर ट्रीटमेंट करून हे पाणी सोडले जाणे आवश्यक आहे. याबाबत प्रश्न उपस्थित केले.

पंढरपूर येथे तीर्थक्षेत्र असून महाराष्ट्रातून भाविकांसाठी १००० खटांचे रुग्णालय सुरू करण्याबाबत जीआर निघाला असून त्याला मंजुरी देऊन जागा उपलब्ध करून देणे. तसेच मेडिकल महाविद्यालयास परवानगी देण्यात यावी. टेंभुर्णी येथे ग्रामीण रुग्णालयात उपकरणांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

टेंभुर्णी, करकंब आणि मोडनिंब येथे नगरपंचायत करण्यात यावी. पंढरपूर तीर्थक्षेत्र म्हणून ओळखलं जातं परंतु लहान मुलांना खेळण्यासाठी (गार्डन) बागेसाठी निधी मिळून देखील कामाला सुरूवात झाली नाही. कामास सुरुवात करण्यात यावी.पंढरपूर येथील यमाई तलाव येथे लेझर शो साठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी केली.




## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अवमान निषेधार्थ उबाठा शिवसेनेचे आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विजय घनघाव/मुंबई : भारतीय घटनेचे शिल्पकार,भारतरत्न, परमपूज्य,महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संसदेत अवमान करणाऱ्या भाजप आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या निषेधार्थ शिवसेना घाटकोपर पूर्व विधानसभेच्या वतीने दिनांक २०डिसेंबर २०२४रोजी सकाळी ११.००वाजता आंदोलन झाले विभागप्रमुख श्री.तुकाराम (सुरेश) पाटील साहेब पक्ष संघटक विलास रूपवते उपविभाग प्रमुख चंद्रपाल चंदनिया यांच्या नेतृत्वाखाली रमाबाई कॉलनी घाटकोपर पूर्व येथील डॉ.बाबासाहेबांच्या पूर्णाकृत प्रतिमे खाली निषेध आंदोलन करण्यात आले. घाटकोपर पूर्व विधानसभेतील सर्व महिला/पुरुष पदाधिकारी,अंगिकृत संघटनेचे पदाधिकारी,युवासेना,युवतीसेना आणि शिवसैनिकांनी उपस्थित होते

## सेंच्युरी रेयॉन हायस्कुलमध्ये विविध स्पर्धेमधील विजेत्या स्पर्धकांना बक्षिस व प्रमाणपत्र वितरण सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर प्रतिनिधी/ बाळासाहेब अहिरे : महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी निर्देश दिल्यानुसार व मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. विकास ढाकणे आणि मा. अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर यांच्या मार्गदर्शनाने उल्हासनगर महानगरपालिका पर्यावरण विभागामार्फत पर्यावरणाचे संवर्धन करणे व प्रदूषण नियंत्रण करणेविषयक जनजागृती उपक्रमांतर्गत सेंच्युरी रेयॉन हायस्कुलमध्ये निबंध स्पर्धा व पोस्टर मेकिंग स्पर्धा घेण्यात आली होती.

दिनांक १७/१२/२०२४ रोजी सेंच्युरी रेयॉन हायस्कुलमध्ये सदरील स्पर्धेमधील विजेत्या स्पर्धकांसाठी बक्षिस/प्रमाणपत्र वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी पर्यावरणाचे संवर्धन करणे व प्रदुषण नियंत्रण करणेविषयक जनजागृतीचा भाग म्हणुन पथनाट्य, गायन व संभाषण



असे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास श्री. विशाल कदम, सहाय्यक आयुक्त (पर्यावरण) उल्हासनगर महानगरपालिका, कंसल्टन श्रीम. गीतांजली कौशिक, सेंच्युरी रेयॉन हायस्कुलचे मा. मुख्याध्यापिका श्रीम. विद्याराणी गायकवाड व श्रीम. बबीता सिंग का (माध्यमिक/प्राथमिक) महापालिकेतील पर्यावरण विभागाचे वरिष्ठ लिपीक, श्री. लक्ष्मण कामडी, श्री. सयाजी घाटविसावे, लिपीक सेंच्युरी शाळेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.

श्री. विशाल कदम, सहाय्यक आयुक्त (पर्यावरण) कंसल्टन श्रीम, गीतांजली कौशिक यांनी पर्यावरण संवर्धन आणि प्रदुषण नियंत्रणाचे महत्व याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.




## दुर्बल घटकांना मदतीचा हात देणे हीच खरी ईश्वर सेवा : मुख्याध्यापक वाजे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी - डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संत गाडगेबाबा यांना अभिवादन करून पुण्यतिथी साजरा करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे होते. व्यासपीठावर सोमनाथ पगार, विद्या ठाकरे, सोमनाथ गिरी, डी. ए.रबडे ,रेखा खंडिझोड, पोलीसपाटील रामदास वारुंगसे,सीमा गोसावी ,वरिष्ठ लिपिक राणी शिंदे,रोहिणी भगत आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले होते . विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी गाडगेबाबा यांच्या कार्याचा आढावा घेऊन त्यांनी स्वच्छता, प्रामाणिकपणा,दीन-दुबळ्यांची सेवा,माणुसकी या गुणाविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या शरीराच्या स्वच्छतेबरोबर आपला परिसर,घर, शाळा इत्यादी घटकांच्या स्वच्छतेकडे लक्ष दयावे.माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागावे .दुर्बल घटकांना मदतीचा हात देणे हीच खरी ईश्वर सेवा आहे मुख्याध्यापक वाजे म्हणाले . सूत्रसंचालन सोमनाथ गिरी यांनी केले तर आभार दिंगबर जाधव यांनी मानले .यावेळी मारुती डगळे, एस.बी.गुरुळे, राजेंद्र गांगुर्डे,कल्पना शिंदे,जयश्री गोहाड,श्रीमती व्ही. टी. देवरे,वृषाली घुमरे,सोमनाथ माळी,रवि गोजरे,किशोर शिंदे, निवृत्ती बर्गे ,संकेत जाधव, ऋषिकेश कुंदे आदींसह शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**डुबेरे येथील जनता विद्यालयात संत गाडगेबाबा यांना अभिवादन**

**वंचित बहुजन आघाडीची मागणी** — **तहसीलदारांना दिले निवेदन**

# सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूला जबाबदार असलेल्यांवर कारवाई करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बोडगांव देवी : परभणी शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या समोरील संविधान शिल्पाची मोडतोड करण्यात आली.

परभणी शहरात भारतीय राज्यघटनेच्या प्रतिमा तसेच राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची विटंबना करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याकरिता आणि पोलिसांच्या कोंबिंग कारवाईत मृत्यू पावलेल्या सोमनाथ व्यंकट सूर्यवंशीच्या गुन्हेगारांना फाशीची शिक्षा देण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन तहसीलदार तहसील कार्यालय अर्जुनी मोर यांच्यामार्फत दिनांक २० डिसेंबर २०२४ ला देण्यात आले.

याप्रकरणी त्वरित चौकशी करण्यात यावी. या प्रकरणात अटक करण्यात आलेला गुन्हेगार हा मानसिक रुग्ण असल्याचे पोलिस विभागाकडून सांगितले जात आहे. हा मानसिक रुग्ण आहे किंवा नाही याची सखोल चौकशी करण्यात यावी. पोलिस कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूला जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी.

परभणी शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यावर दगडफेक करून पुतळ्यास क्षती पोहोचविण्याचा तसेच पुतळा परिसरात असलेल्या संविधानाची प्रतिकृती तोडफोड करण्याचा प्रयत्न करून मोठा अनुचित प्रकार घडविण्याचा प्रकार होता. म्हणून सदर घटनेचा आम्ही निषेध करीत आहोत.




तसेच एलएलबी च्या परिक्षेला आलेल्या सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी यास पोलिसांनी कोंबिंग कारवाईत निर्दयपणे मारहाण करून त्यास आरोपी केले. जनावरांना पण कोणी एवढ्या निर्देशाने मारहाण करीत नाही तेवढ्या क्रूरपणे पोलिसांनी बऱ्याच लोकांना मारहाण केली. पहिल्या दिवशी प्रचंड मारहाण झालेल्यांना पोलिसांनी मेडिकलसाठी दवाखान्यात घेऊन गेले नाहीत. उलट डॉक्टरांना पोलीस ठाण्यात बोलावून त्या सर्वांचे मेडिकल केले.

पोलिसांनी दहशत निर्माण करून आंबेडकरी वस्त्यांमध्ये दोन दिवस हौदोस माजविला. यात सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला. एकूणच आंबेडकरी समाज आणि आंबेडकरी चळवळ यांना नेस्तनाभूत करावयाची आहे. यासाठीच त्यांनी पोलिसांना फ्रीहँड दिलेला आहे.

केंद्र सरकार, राज्य सरकार आणि पोलिसांच्या कारवाईवर आमचा तसुभरही विश्वास राहिलेला नाही. यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तातडीने न्यायालयीन चौकशीची मागणी करीत आहे. सोबतच पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड सह दोषी पोलिसांवर सदोष मनुष्यवदाचा गुन्हा दाखल करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी सदर प्रकरण अधिक चिघळू नये व राज्यव्यापी आंदोलन पसरू नये याकरिता जबाबदार अधिकारी कर्मचारी व जातीयवादी प्रवृत्तीवर त्वरित कार्यवाही करुन आंबेडकरवादी समाजाला न्याय देण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसिल कार्यालय अर्जुनी मोर चे तहसीलदार यांच्या मार्फत निवेदनाच्या माध्यमातून मागणी करण्यात येत आहे.

यावेळी तालुकाध्यक्ष किशोर तागडे वंचित बहुजन आघाडी अर्जुनी मोर, जिल्हा उपाध्यक्ष महादेव सलामे वं. ब. आ. गोंदिया, युवा तालुकाध्यक्ष कैलास इस्कापे वं. ब. आ अर्जुनी मोर, युवा तालुका उपाध्यक्ष दिपेंद्र उके वं. ब. आ अर्जुनी मोर, युवा तालुका महासचिव संदीप नंदागवळी वं. ब. आ अर्जुनी मोर, युवा तालुका महासचिव रोहित रामटेके वं. ब. आ अर्जुनी मोर, युवा तालुका संघटक हर्षपाल लोणारे वं. ब. आ अर्जुनी मोर, युवा तालुका संघटक लोमेश सांगोळे वं. ब. आ अर्जुनी मोर, युवा तालुका संघटक आशिष कांबळे वं. ब. आ अर्जुनी मोर, युवा तालुका प्रसिद्धी प्रमुख विश्वरत्न रामटेके वं. ब आ अर्जुनी मोर, शुभम मेश्राम अर्जुनी मोर, प्रितम राजकुमार टेंभूर्णे करांडली, अक्षय खुशाल कटरे अर्जुनी मोर, धनंजय गोंडाणे अर्जुनी मोर, प्रकाश मनिराम टेंभूर्णे अर्जुनी मोर, अजय नामदेव कुंभरे तावशी व अन्य समाज बांधव उपस्थित होते.